**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1760/2007 व 1790/2007.**

श्री नरेंद्र श्रीराम ठाकरे

माकडे नगर, तुमसर

ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील कमांक 1760/2007</u>**

1) श्री पि. आर. थुटे प्रथम अपीलीय अधिकारी तथा

खंड विकास अधिकारी (उ.श्रे.)

पंचायत समिती तुमसर

2) जन माहिती अधिकारी तथा

1. गटशिक्षणाधिकारी पं. स. तुमसर
2. श्री प्रशांत वैद्य, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पं. स. तुमसर
3. श्री दिनेश हरिणखेडे वि. अ. (पंचायत) पं. स. तुमसर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक 1790/2007</u>**

2) श्री के. टी. मरकाम

जन माहिती अधिकारी तथा

शाखा अभियंता

पंचायत समिती कार्यालय तुमसर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 16.7.2008 )

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.6.2007 व 14.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1760/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 9.3.2007 रोजी जिल्हा परिषद अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीबाबत विविध उपयोगासाठी (सन 2005 ते 2006) 1) पंचायत समिती अंतर्गत येणा–या विविध गावासाठी आपणास एकुण किती निधी प्राप्त झाला व कोणती कामे करण्यात आली 2) यापैकी किती गावात या निधीद्वारे कामे करण्यात आली व उर्वरीत रक्कम किती 3) सन 2007 पर्यंत झालेल्या ऑडिट मध्ये आक्षेप घेण्यात आले काय? अशी माहिती विचारुन ती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 13.4.2007 रोजी खंड विकास अधिकारी पंचायत समिती तुमसर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 24.5.2007 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता श्री नरेंद्र ठाकरे यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे. व मिळालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झाले आहे. 20 (1) (2) प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मा. माहिती आयुक्त यांना असल्यामुळे माहितीचे संदर्भात आपले मत नोंदविणे आवश्यक आहे. करीता सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व खंड विकास अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे दिरंगाईस्तव 20 (1) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती करण्यात येत

आहे. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली त्या माहिती करीता पशुधन विकास अधिकारी हे माहिती अधिकारी आहेत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व विद्यमान माहिती अधिकारी हे हजर आहेत. त्यांनी माहिती ही दि. 22.4.2006 रोजी उपलब्ध करुन दिली आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी वर नमुद केलेला दिनांक 24.5.2007 च्या आदेशाची प्रत ही त्यांच्या दि. 1.3.2006 च्या अर्जाच्या संदर्भात आहे. परंतु संबंधित निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या कागदपत्रामध्ये कां दाखल केली याबद्यलचे कारण ते सांगू शकत नाही. त्यामुळे वरील निर्णय हया निर्णयात वाचण्यात येवू नये. सदरच्या दि. 9.3.2007 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 28.5.2007 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असून त्यामध्ये अपीलकर्ता श्री नरेंद्र ठाकरे यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे व मिळालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झाल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिला आहे. माहिती विलंबाने उपलब्ध होण्याचे कारण माहिती ही अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः मागितली आहे व 30 दिवसाच्या कालावधीमध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यास व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे जाणे हे बंधनकारक आहे. व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमुद केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या घरी माहिती आणून देणे किंवा पत्र पाठविणे हे अपेक्षित नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ते संबंधित कक्ष अधिकारी यांनी विलंबानी अर्ज हस्तांतर केला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे विलंबाने उपलब्ध झालेली दिसून येते. व त्याकरीता कक्ष अधिकारी हे दोषी आढळुन येतात. त्याबाबत दि. 21.3.2006 चे पत्र सुध्दा कक्ष अधिकारी यांनी पशुधन विकास अधिकारी यांना दिलेले दिसून येतात. व त्याकरीता कक्ष अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2)

प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करणे हे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात पात्र आहे.

4. अपील क्रमांक 1790/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.1.2007 रोजी शाखा अभियंता बांधकाम विभाग पंचायत समिती कार्यालय तुमसर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 26.3.2007 रोजी देण्यात आला असून ''गैरअर्जदार यांनी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे पालन करण्यास कसुर केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 7 (6) अन्वये माहिती अर्जदार यांना तात्काळ मोफत पुरविण्यात यावी. अर्जदार यांनी 20 (1) (2) नुसार कार्यवाही करण्याबाबत आपले मत नोंदविलेले आहे. परंतु कार्यवाही करण्यासंबंधाने अधिकार राज्य माहिती आयोगाला असल्यामुळे अर्जदार यांनी माहिती संबंधाने मत नोंदविणे अभिप्रत आहे. तेव्हा वरील परिभाषेत अपिल अंशतः निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी शाखा अभियंता माहिती अधिकारी नसतांना सुध्दा त्यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती जरी विलंबाने उपलब्ध झालेली असली तरी शाखा अभियंता हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांना जबाबदार धरता येणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

5

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1760/2007 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून संबंधित जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सदरच्या अर्जाचे हस्तांतर विलंबाने केल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

2) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी करावयाची असून निर्यायाची प्रत स्वतंत्रपणे मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपील क्रमांक 1790/2007 हे खारीज करण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 16.7.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.